भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# जनगणना अधिनियम, १९४८

(सन १९४८ चा अधिनियम क्रमांक ३७)

[२९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान]

# The Census Act, 1948

## (Act No. 37 of 1948)

[*As in force on the 29th May 1992*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी

भारत सरकारच्या वतीनें मुद्रित व प्रकाशित केले

(१९९२)

[किंमत रु. १-७०]

# जनगणना अधिनियम, १९४८

## कलमांचा क्रम

१. संक्षिप्त नाव व विस्तार
२. जम्मू आणि काश्मीर राज्यावर विस्तार नसलेल्या अधिनियमितींच्या संबंधात अन्वयार्थाचा नियम
३. जनगणना केंद्र शासनाने करणे.
४. जनगणना कर्मचारीवर्गाची नियुक्ती.
५. लोकसेवक म्हणून जनगणना प्राधिकाऱ्यांचे स्थान.
६. विवक्षित प्रकरणी जनगणना अधिकाऱ्यांची कर्तव्ये पार पाडणे.
७. विवक्षित व्यक्तींना सहाय्य देण्याचे आवाहन करण्याची शक्ती.
८. प्रश्न विचारणे आणि उत्तरे देण्याविषयीचे आबंधन.
९. वहिवाटदाराने प्रवेश करण्यास आणि क्रमांक घालण्यास परवानगी देणे.
१०. वहिवाटदाराने अथवा व्यवस्थापकाने अनुसूची भरणे.
११. शास्ती.
१२. खटल्याकरिता मंजुरी आवश्यक असणे.
१३. इतर कायद्यांच्या प्रवर्तनास आडकाठी नसणे.
१४. अधिकारिता.
१५. जनगणनेच्या नोंदी निरीक्षणार्थ खुल्या नसणे आणि त्या पुराव्यात ग्राह्य नसणे.
१६. नगरपालिकेत जनगणना करण्याच्या पद्धतीविषयीच्या इतर कायद्यांचे तात्पुरते निलंबन.
१७. सांख्यिकी गोषवारे देणे.
१८. नियम करण्याची शक्ती.

शा.म.मु. एच ४३६३ (१०३४—४-९३)

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान असलेला जनगणना अधिनियम, १९४८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ३, अंक ३, दिनांक २ जुलै १९९२ यात पृष्ठ १४९ ते १५२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली
दिनांक : २ जुलै १९९२

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Census Act, 1948 as on the 29th May 1992 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary, Part XII, Section 1 No. 3, Vol. 3, dated 2nd July 1992 on pages 149 to 152.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

NEW DELHI
Dated : 2nd July 1992.

K. L. MOHANPURIA.
Secretary to the Government of India.

# जनगणना अधिनियम, १९४८

## (१९४८ चा अधिनियम क्रमांक ३७)

(२९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान)

[ ३ सप्टेंबर १९४८ ]

जनगणना करण्याविषयीच्या विवक्षित बाबींकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** भारतात [1]* * * * अथवा त्याच्या कोणत्याही भागात जनगणना करणे जेव्हा जेव्हा आवश्यक अथवा इष्ट असेल तेव्हा तेव्हा त्याकरिता उपबंध करणे आणि अशी जनगणना करण्याविषयीच्या विवक्षित बाबींकरिता उपबंध करणे समयोचित आहे;

**त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, "जनगणना अधिनियम, १९४८" असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व विस्तार.

[2][(२) त्याचा विस्तार [3][* * * *] संपूर्ण भारतभर आहे.]

[4][२. या अधिनियमातील भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) अथवा भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) याच्या कोणत्याही संदर्भाचा अन्वयार्थ, जम्मू आणि काश्मीर राज्याच्या बाबतीत, त्या राज्यात अंमलात असलेल्या समनुरूप अधिनियमितींचा संदर्भ असल्याप्रमाणे करण्यात येईल.] जम्मू आणि काश्मीर राज्यावर विस्तार नसलेल्या अधिनियमितींच्या संबंधात अन्वयार्थाचा नियम.

३. ज्यावेळी संपूर्ण राज्यक्षेत्रात किंवा या अधिनियमाचा ज्यावर विस्तार आहे अशा त्याच्या कोणत्याही भागात जनगणना करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे केंद्र शासनाला वाटेल त्यावेळी ते **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आपला तसे करण्याचा उद्देश घोषित करील आणि तद्नंतर जनगणना करण्यात येईल. जनगणना केंद्र शासनाने करणे.

४. (१) केंद्र शासन, ज्या क्षेत्रात जनगणना करण्याचा त्याचा उद्देश असेल त्या संपूर्ण क्षेत्रात जनगणना करण्याच्या कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी एका जनगणना आयुक्ताची आणि अनेक राज्यांमध्ये जनगणना करण्याच्या कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी जनगणना कार्य संचालकाची नियुक्ती करू शकेल. जनगणना कर्मचारी-वर्गाची नियुक्ती.

(२) राज्य शासन, कोणत्याही विनिर्दिष्ट स्थानिक क्षेत्रात जनगणना करणे किंवा त्यात सहाय्य करणे ; अथवा जनगणना करण्याच्या कामाचे पर्यवेक्षण करणे यासाठी जनगणना अधिकारी म्हणून व्यक्तींची नियुक्ती करू शकेल आणि अशा व्यक्ती, जेव्हा त्यांची अशा रीतीने नियुक्ती करण्यात आली असेल तेव्हा तदनुसार सेवा करण्यास बद्ध असतील.

(३) कोणत्याही स्थानिक क्षेत्राकरिता जनगणना अधिकारी म्हणून यथोचितरीत्या नियुक्ती करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य शासन याबाबतीत प्राधिकृत करील त्या कोणत्याही प्राधिकरणाकडून स्वाक्षरित करण्यात आलेले लेखी घोषणापत्र हा अशा नियुक्तीचा निर्णायक पुरावा असेल.

(४) राज्य शासन, त्याला योग्य वाटेल त्या प्राधिकाऱ्यास, पोट-कलम (२) द्वारे, जनगणना अधिकाऱ्याच्या नियुक्तीची शक्ती, प्रत्यायोजित करू शकेल.

५. जनगणना आयुक्त, सर्व जनगणना कार्य संचालक आणि सर्व जनगणना अधिकारी हे, भारतीय दंड संहितेच्या अर्थान्तर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. लोकसेवक म्हणून जनगणना प्राधिकाऱ्यांचे स्थान.

---

[1] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांत व प्रवेशी राज्ये यांच्यात" हा मजकूर निरसित करण्यात आला.

[2] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पूर्वीच्या पोट-कलमाऐवजी दाखल केले.

[3] १९५९ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २ अन्वये "जम्मू व काश्मीर राज्यांखेरीज" हा मजकूर वगळण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे दाखल करण्यात आले. सन १९५७ चा अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम २ व अनुसूचीद्वारे मूळ कलम २ गाळले होते.

विवक्षित प्रकरणी जनगणना अधिकाऱ्यांची कर्तव्ये पार पाडणे.

६. (१) जेव्हा जिल्हा दंडाधिकारी किंवा राज्य शासन याबाबतीत नियुक्त करील असा प्राधिकारी लेखी आदेशाद्वारे असे निदेश देईल की,—

(क) भारताची नौसेना, भूसेना अथवा वायुसेना यातील कोणत्याही व्यक्तींचा समूह अथवा भारताची कोणतीही युद्धनौका यावर अधिपत्य असणारा प्रत्येक अधिकारी,

(ख) जिच्याकडे एखाद्या नौकेचे नियंत्रण अथवा प्रभार आहे अशी प्रत्येक व्यक्ती (पायलट अथवा हार्बर मास्टर खेरीज),

(ग) वेडयांचे रुग्णालय, रुग्णालय, कार्यगृह, कारागृह, सुधारालय अथवा अटक-कोठडी अथवा कोणत्याही सार्वजनिक धर्मादाय, धार्मिक अथवा शैक्षणिक संस्थेची प्रभारी असणारी प्रत्येक व्यक्ती,

(घ) कोणतीही सराय, हॉटेल, वसतिगृह, निवासगृह, उत्प्रवास आगार अथवा क्लब याचा प्रत्येक रक्षक, सचिव अथवा व्यवस्थापक,

(ङ) एखाद्या रेल्वेचा अथवा कोणत्याही वाणिज्यिक अथवा औद्योगिक आस्थापनेचा प्रत्येक व्यवस्थापक अथवा अधिकारी, आणि

(च) जनगणना करण्याचे काम चालू असतानाच्या वेळी, ज्यात व्यक्ती राहत असतील अशा स्थावर मालमत्तेचा प्रत्येक वहिवाटदार,

जनगणना करण्याचे काम चालू असतानाच्या वेळी त्याच्या अधिपत्याखाली अथवा प्रभाराखाली असतील अथवा त्याच्या घरात सहवासी असतील अथवा अशा स्थावर मालमत्तेत उपस्थित असतील अथवा त्याच्या नियंत्रणाखाली नियुक्त करण्यात आल्या असतील, अशा सर्व व्यक्तींच्या संबंधात, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी जनगणना अधिकाऱ्याची कर्तव्ये करील.

(२) या अधिनियमातील जनगणना अधिकाऱ्याच्या संबंधातील सर्व उपबंध, होईल तेथवर, या कलमान्वये अशी कर्तव्ये करत असताना सर्व व्यक्तींस लागू होतील, आणि या कलमान्वये जे कोणतेही कर्तव्य करण्याचा निदेश देण्यात आला असेल, ते कर्तव्य करण्यास जी नकार देईल अथवा ते करण्याबाबत हयगय करील अशा कोणत्याही व्यक्तीने, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम १८७ खालील अपराध केला आहे असे मानण्यात येईल.

विवक्षित व्यक्तींना सहाय्य देण्याचे आवाहन करण्याची शक्ती.

७. जिल्हा दंडाधिकारी, अथवा राज्य शासन, याबाबतीत कोणत्याही स्थानिक क्षेत्राकरिता नियुक्त करील असे प्राधिकरण, त्याच्या जिल्ह्याच्या अथवा, प्रकरणपरत्वे, अशा स्थानिक क्षेत्राच्या संपूर्ण विस्तारात ज्याचा अंमल राहील अशा लेखी आदेशाद्वारे पुढील लोकांना आवाहन करू शकेल की,—

(क) जमिनींचे सर्व मालक आणि वहिवाटदार, धृतिधारक आणि शेतकरी व जमीन महसुलाचे अभिहस्तांकिती अथवा त्यांचे अभिकर्ते,

(ख) जिल्हा, नगरपालिका, पंचायत आणि इतर स्थानिक प्राधिकरणे व अशा प्राधिकरणांचे अधिकारी व कर्मचारी, आणि

(ग) कोणताही कारखाना, पेढी अथवा आस्थापना याचे सर्व अधिकारी व कर्मचारीवर्गाचे सदस्य,

जनगणना करण्याच्या वेळेस, असे मालक, वहिवाटदार, धृतिधारक, शेतकरी आणि अभिहस्तांकिती यांच्या जमिनीवर अथवा कारखाने, पेढ्या आणि इतर आस्थापना यांच्या जागेत, अथवा, प्रकरणपरत्वे, अशा स्थानिक प्राधिकरणांची स्थापना ज्यांच्याकरिता करण्यात आली आहे त्या क्षेत्रात, असलेल्या व्यक्तींची जनगणना करण्याच्या बाबतीत, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल असे सहाय्य द्यावे आणि या कलमानुसार ज्या व्यक्तींना असा आदेश निदेशित केला असेल, त्या व्यक्ती त्याचे पालन करण्यास बांधील राहतील आणि अशा आदेशाच्या अनुषंगाने कृती करीत असताना त्या भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) अर्थान्तर्गत लोकसेवक आहेत असे मानण्यात येईल.

प्रश्न विचारणे आणि उत्तरे देण्याविषयीचे आबंधन.

८. (१) जनगणना अधिकारी, त्याची नियुक्ती ज्या क्षेत्रासाठी करण्यात आली असेल, त्या स्थानिक क्षेत्राच्या सीमांमधील सर्व व्यक्तींना राज्य शासनाने या बाबतीत, दिलेल्या आणि **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेल्या सूचनांद्वारे त्यास जे प्रश्न विचारण्याविषयी निर्देशित करण्यात येईल असे सर्व प्रश्न विचारू शकेल.

(२) पोट-कलम (१) खाली जिला कोणताही प्रश्न विचारण्यात आला असेल अशा प्रत्येक व्यक्तीला, अशा प्रश्नांची उत्तरे, तिच्या संपूर्ण माहितीप्रमाणे अथवा विश्वासाप्रमाणे देणे हे कायद्याने बंधनकारक राहील:

परंतु, कोणत्याही व्यक्तीवर तिच्या कुटुंबातील कोणत्याही स्त्री सदस्याचे नाव सांगण्याचे बंधन असणार नाही, आणि कोणत्याही स्त्रीवर तिच्या पतीचे अथवा मृत पतीचे अथवा रूढीद्वारे तिला मनाई असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीचे नाव सांगण्याचे बंधन असणार नाही.

९. कोणत्याही घराची, कुंपणाची, नौकेची अथवा इतर जागेची वहिवाटदार असलेली प्रत्येक व्यक्ती, जनगणना अधिकाऱ्यांस त्यांस जनगणनेच्या प्रयोजनांकरिता ज्या ठिकाणी आवश्यक असेल आणि देशातील रूढींचा विचार करता जो वाजवी असेल असा प्रवेश करू देईल. आणि त्या ठिकाणी जनगणनेच्या प्रयोजनांकरिता आवश्यक असतील अशी अक्षरे, चिन्हे अथवा क्रमांक रंगवू अथवा लावू देईल. वहिवाटदाराने प्रवेश करण्यास आणि क्रमांक घालण्यास परवानगी देणे.

१०. (१) राज्य शासन याबाबतीत देईल अशा आदेशांच्या अधीनतेने, जनगणना अधिकारी, ज्या क्षेत्रासाठी त्याची नियुक्ती करण्यात आली असेल त्या स्थानिक क्षेत्रात, जनगणना करण्याच्या वेळी, कोणत्याही निवासी घराच्या किंवा त्याच्या भागाच्या वहिवाटदाराने किंवा वाणिज्यिक अथवा औद्योगिक आस्थापनेच्या व्यवस्थापकाने किंवा कोणत्याही अधिकाऱ्याने, अशा घरात अथवा त्याच्या एखाद्या भागात निवास करणाऱ्या व्यक्तीसंबंधी किंवा व्यवस्थापकाने किंवा, प्रकरणपरत्वे, अधिकाऱ्याने आपल्या हाताखाली नियुक्त केलेल्या व्यक्तीसंबंधी राज्य शासन निदेश देईल असा तपशील भरून देण्याच्या प्रयोजनासाठी, एक अनुसूची, अशा वहिवाटदाराकडे किंवा व्यवस्थापकाकडे किंवा अधिकाऱ्याकडे ठेवू शकेल किंवा ठेवण्याची व्यवस्था करू शकेल. वहिवाटदाराने अथवा व्यवस्थापकाने अनुसूची भरणे.

(२) जेव्हा अशी अनुसूची अशा प्रकारे ठेवण्यात आली असेल तेव्हा, उक्त वहिवाटदार, व्यवस्थापक अथवा, प्रकरणपरत्वे, अधिकारी, उपरोक्त वेळी, असे घर अथवा त्याच्या कोणत्याही भागातील निवासी व्यक्तीच्या संबंधात अथवा त्याच्या हाताखाली नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या संबंधात, तो आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे अथवा विश्वासाप्रमाणे ती भरून देईल अथवा भरून देण्याची व्यवस्था करील आणि त्यावर आपल्या नावानिशी सही करील आणि जेव्हा तसे फर्मावण्यात आले असेल तेव्हा अशा प्रकारे भरलेली व नावानिशी सही केलेली अनुसूची जनगणना अधिकाऱ्याच्या अथवा जनगणना अधिकारी निदेशित करील अशा व्यक्तीच्या स्वाधीन करील.

११. (१) (क) कोणताही जनगणना अधिकारी अथवा जनगणनेच्या कामात सहाय्य देण्याकरिता ज्यास कायदेशीरपणे फर्मावण्यात आले आहे अशी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमानुसार अथवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमानुसार तिच्यावर लादण्यात आलेले कोणतेही कर्तव्य पार पाडण्यास अथवा तिला देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यास नकार देईल किंवा वाजवी कार्यासक्ती वापरण्याबाबत हयगय करील अथवा जी व्यक्ती असे कर्तव्य पार पाडणाऱ्या अथवा अशा आदेशाचे पालन करीत असलेल्या इतर व्यक्तीला अडथळा करील अथवा विघ्न आणील, किंवा शास्ती.

(ख) जो कोणताही जनगणना अधिकारी जाणीवपूर्वक कोणतेही प्रक्षोभक अथवा अनुचित प्रश्न विचारील अथवा जाणीवपूर्वक कोणतेही खोटे विवरण तयार करील अथवा केन्द्र शासनाच्या अथवा राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीविना, जनगणना विवरणाद्वारे अथवा त्या प्रयोजनाकरिता जी कोणतीही माहिती त्याला मिळाली असेल ती उघड करील, अथवा

(ग) जो कोणतेही जनगणनेचे कागदपत्र हलवील, लपवील, त्यांस हानी पोचवील अथवा नष्ट करील अथवा जनगणनेच्या कागदपत्रांसंबंधात अशी कार्यवाही करील की, त्यायोगे जनगणनेच्या फलितांचे सारणीकरण खोटे ठरेल किंवा त्यास हानी पोहोचेल असा कोणताही पृथक्कार, संकलक अथवा जनगणना कर्मचारीवर्गाचा इतर सदस्य, अथवा

(घ) ज्याचे उत्तर देण्याचे कलम ८ द्वारे तिच्यावर कायदेशीरपणे बंधनकारक असेल अशी जी कोणतीही व्यक्ती, जनगणना अधिकाऱ्याकडून तिला विचारण्यात आलेल्या प्रश्नाचे जाणीवपूर्वक चुकीचे उत्तर देईल अथवा तिच्या संपूर्ण माहितीप्रमाणे अथवा विश्वासाप्रमाणे उत्तर देण्याचे नाकारील ती, अथवा

(ङ) कोणतेही घर, कुंपण, नौका अथवा इतर कोणत्याही जागेची वहिवाटदार असणारी जी कोणतीही व्यक्ती, जनगणना अधिकाऱ्यास, त्या ठिकाणी त्यास आवश्यक असेल असा वाजवी प्रवेश, जो देण्यास कलम ९ द्वारे तिला फर्मावण्यात आले आहे, तो देण्यास नकार देईल ती व्यक्ती, अथवा

(च) जनगणनेच्या प्रयोजनाकरिता, जी कोणतीही अक्षरे, चिन्हे अथवा क्रमांक रंगवण्यात अथवा लावण्यात आले असतील, ती हलवील, पुसून टाकील, बदलील अथवा खराब करील अशी कोणतीही व्यक्ती, अथवा

(छ) जी, कलम १० खाली फर्मावण्यात आले असता, अनुसूची भरण्यात जाणूनबुजून आणि पुरेशा कारणाखेरीज त्या कलमाच्या उपबंधांचे अनुपालन करण्यात कसूर करील अथवा त्याखाली कोणतेही असत्य विवरण देईल अशी कोणतीही व्यक्ती, अथवा

(ज) जी, जनगणना कार्यालयात अपप्रवेश करील अशी कोणतीही व्यक्ती,

एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि भाग (ख) अथवा (ग) खालील अपराध सिद्ध झाल्यास, तिला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षाही दिली जाईल.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) खालील कोणत्याही अपराधास अपप्रेरणा देईल त्याला एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

खटल्याकरिता मंजुरी आवश्यक असणे.

१२. राज्य शासनाच्या अथवा राज्य शासनाद्वारे याबाबत प्राधिकृत करण्यात आलेल्या एखाद्या प्राधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीखेरीज, या अधिनियमाखाली कोणताही खटला दाखल केला जाणार नाही.

इतर कायद्यांच्या प्रवर्तनास आडकाठी नसणे.

१३. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही व्यक्तीवर, जी या अधिनियमान्वये अपराध ठरते अशी कोणतीही कृती किंवा अकृती या करता इतर कोणत्याही कायद्यान्वये खटला भरण्यास प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही :

परंतु, कलम १२ मध्ये निर्देशित केलेल्या पूर्वमंजुरीखेरीज असा कोणताही खटला दाखल केला जाणार नाही.

अधिकारिता.

१४. इलाखा शहर दंडाधिकारी अथवा द्वितीय वर्ग दंडाधिकारी [1][ * * *] यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असणारे कोणतेही न्यायालय, जी या अधिनियमाखाली अपराध ठरते अशा कोणत्याही कृतीची अथवा अकृतीची, या अधिनियमान्वये असो अथवा इतर कोणत्याही कायद्यान्वये असो, संपरीक्षा करणार नाही.

जनगणनेच्या नोंदी निरीक्षणार्थ खुल्या नसणे आणि त्या पुराव्यात ग्राह्य नसणे.

१५. कोणत्याही व्यक्तीला, एखादा जनगणना अधिकारी या नात्याने आपले कर्तव्य पार पाडत असताना त्याने तयार केलेले कोणतेही पुस्तक, नोंदवही अथवा अभिलेख अथवा कलम १० अन्वये स्वाधीन करण्यात आलेली कोणतीही अनुसूची यांचे निरीक्षण करण्याचा अधिकार असणार नाही आणि भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) यामध्ये एतद्विरुद्ध काहीही असले तरी, असे कोणतेही पुस्तक, नोंदवही, अभिलेख अथवा अनुसूची यातील कोणतीही नोंद, या अधिनियमाखाली अपराध ठरत असणारी कोणतीही कृती अथवा अकृती याकरिता ह्या अधिनियमान्वये अथवा इतर कोणत्याही कायद्यान्वये भरण्यात आलेल्या खटल्याखेरीज इतर कोणत्याही दिवाणी कार्यवाहीत अथवा कोणत्याही फौजदारी कार्यवाहीत पुरावा म्हणून ग्राह्य असणार नाही.

नगरपालिकेत जनगणना करण्याच्या पद्धतीविषयीच्या इतर कायद्यांचे तात्पुरते निलंबन.

१६. कोणत्याही नगरपालिकेत जनगणना ज्या पद्धतीने करावयाची असेल त्या पद्धतीसंबंधात कोणतीही अधिनियमिती अथवा नियम यात काहीही असले तरी, नगरपालिका प्राधिकरण, जनगणना कार्य संचालकाचा अथवा याबाबतीत राज्य शासन प्राधिकृत करील अशा प्राधिकरणाचा विचार घेऊन, कोणत्याही जनगणनेकरिता नियत केलेल्या वेळी, त्या नगरपालिकेची जनगणना पूर्णत: अथवा अंशत: या अधिनियमाद्वारे अथवा तदन्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही पद्धतीने केली जाण्याची व्यवस्था करील.

सांख्यिकी गोषवारे देणे.

१७. जनगणना आयुक्त अथवा कोणताही जनगणना कार्य संचालक अथवा राज्य शासन याबाबतीत प्राधिकृत करील अशी व्यक्ती, तिला योग्य वाटल्यास, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने अथवा व्यक्तीने विनंती केली असता आणि त्याच्या खर्चाने (जो त्याच्याकडून निर्धारित करण्यात येईल) गोषवारा तयार करण्याची व पुरवला जाण्याची व्यवस्था करील आणि त्यामध्ये अशी सांख्यिकी माहिती समाविष्ट असेल की, जी [2][भारताच्या अथवा, प्रकरणपरत्वे, कोणत्याही राज्याच्या] जनगणना विवरणावरूनच प्राप्त होऊ शकेल, व जी कोणत्याही प्रकाशित अहवालात समाविष्ट झालेली नसेल आणि जी त्या प्राधिकरणास अथवा व्यक्तीस आवश्यक असणे त्याच्या मते, वाजवी असेल.

नियम करण्याची शक्ती.

१८. (१) केन्द्र शासन, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करू शकेल.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेस बाध न आणता केन्द्र शासन, जनगणना अधिकाऱ्यांच्या आणि जनगणना अधिकाऱ्यांची कोणतीही कर्तव्ये पार पाडण्याकरिता अथवा जनगणना करण्यास सहाय्य करण्याकरिता, व्यक्तींच्या नियुक्तीकरिता आणि अशा अधिकाऱ्यांना आणि व्यक्तींना द्यावयाच्या सर्वसाधारण सूचनांकरिता उपबंध करण्याकरिता नियम करू शकेल.

---

[1] १९५० चा अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम ४ द्वारे समाविष्ट करण्यात आलेला "अथवा भाग ख राज्यातील द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याशी समतुल्य असा दंडाधिकारी" हा मजकूर विधि अनुकूलन आदेश, (क्रमांक ३) १९५६ द्वारे वगळण्यात आला.

[2] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "भारताचा प्रांत किंवा भारताचे प्रांत" या ऐवजी दाखल केले.